दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३०१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२५ जानेवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



### आता पेटवू सारे रान; एक महिन्याचा अल्टिमेटम ; येत्या काळात तब्बल एक लाख भूमिपुत्र रस्त्यावर उतरणार

# दिबांच्या नावासाठी १०५ हुतात्मे द्यायला तयार : दशरथदादा पाटील

## तो पर्यंत लढाई अधिकाधिक तीव्र केली जाईल : मा.खा.लोकनेते रामशेठ ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

**आता पेटवू सारे रान असा एल्गार करत भूमिपुत्रांनी सिडकोला त्यांच्या पापांचे प्रायश्चित करण्यासाठी एक महिन्याचा अल्टिमेटम दिला आहे. एवढेच नाही तर सिडको वठणीवर नाही आली तर येत्या काळात तब्बल एक लाख भूमिपुत्र रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा या आंदोलनातून जाहीर करण्यात आला आहे. दिबांच्या नावासाठी काहीही झाले तरी चालेल, अशी रोखठोक भूमिका कायम ठेवत 'जय दिबा' असा जयघोष करत आज (२४ जानेवारी) ओ-वळे फाटा येथे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लाक्षणिक काम बंद आंदोलन लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, २७ गाव प्रकल्पबाधित कृती समिती यांच्या नेतृत्वाखाली हजारो प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या साक्षीने झाले.**

प्रकल्पग्रस्तांच्या मागील आंदोलनांचा अनुभव घेत या आंदोलनावेळी हजारो पोलिसांचा फौजफाटा तैनात करावा लागला होता. वारकरी मंडळींनी टाळ पखवाजचा ठेका घेत दिबांचा जयजयकार केला. तर दिबासाहेबांचा विजय असो, जमीन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची, सिडको मुर्दाबाद, अशा घोषणांनी भूमिपुत्रांनी आसमंत दणाणून सोडला होता. या आंदोलनाचा धसका घेऊन सिडकोने स्वतःहून विमानतळाचे काम बंद केले. अन्यथा विमानतळ क्षेत्रात घुसून काम बंद करण्याची तयारी यावेळी स्प्ष्टपणे दिसत होती. मात्र विमानतळाचे काम बंद आहे कि नाही याची खात्री करण्यासाठी आमदार महेश बालदी, नंदराज मुंगाजी यांच्या नेतृत्वाखाली भूमिपुत्रांच्या ५० भूमिपुत्रांनी विमानतळ कामाची पाहणी करून काम बंद असल्याची खात्री केली.

रखरखत्या उन्हात या आंदोलनात लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, २७ गाव प्रकल्पबाधित कृती समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीता पाटील, सभागृहनेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर जगदिश गायकवाड, कॉम्रेड भूषण पाटील, राजाराम पाटील, संतोष केणे, गुलाब वझे, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, समितीचे खजिनदार जे. डी. तांडेल, दशरथ भगत, रुपेश धुमाळ, प्रेम पाटील, राजेश गायकर, दीपक पाटील, उत्तम कोळी, सुनील पाटील, किसान सभेचे रामचंद्र म्हात्रे, प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, अमर पाटील, दिलीप पाटील, विजय चिपळेकर, प्रवीण पाटील, संतोष शेट्टी, विकास घरत, नगरसेविका दर्शना भोईर,चारुशीला घरत, सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, प्रमिला पाटील, युवा नेते दशरथ म्हात्रे, कुंडेवहालचे सरपंच सदाशिव वास्कर, विजय घरत, गोवर्धन डाऊर, दगडू गायकवाड, युवा, महिला, ज्येष्ठ नागरिक हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

रायगडला दिबा नावाचे नेतृत्व दैवत मिळाले आहे. भूमिपुत्रांचे हे आंदोलन दीर्घकाळ चालणार आहे, आणि तशी तयारी भूमिपुत्रांनी ठेवली आहे. सरकारची सकारात्मक दृष्टी होत नाही तो पर्यंत आक्रमक पवित्रा असणार असून यापुढे तीव्र आणि आक्रमक आंदोलन असतील. भूमिपुत्र संतापलेला आहे. त्यामुळे सिडकोच्या अधिकाऱ्यांना बांगड्या भरायला कमी पडणार नाही.

भूमिपुत्रांच्या बाबतीत सिडकोच्या एमडींकडे निर्णय क्षमता नसेल तर त्यांनी पद सोडावे. हे सरकार रक्तपिसावू असेल तर रक्त घ्या पण दिबांचे नाव आणि प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या सरकारने पूर्ण कराव्यात. राजू शेट्टी, आमदार जयंत पाटील यांनीही दिबांच्या नावास पाठींबा दिला आहे. दिबांच्या नावासाठी सर्व पक्षातील नेत्यांनी राजकीय चपला बाजूला सारून सहभागी झाले पाहिजे. हे आंदोलन अनेक वर्ष चालेलही पण भूमिपुत्र शांत राहणार नाही आणि भूमिपुत्र अशांत झालं तर सरकार चालवणे कठीण होईल. संयुक्त महाराष्ट्रासाठी १०५ हुतात्मे झाले तसे दिबांच्या नावासाठी १०५ हुतात्मे द्यायला तयार आहोत. पुढील २४ तारखेला पुन्हा आंदोलन करणार आहोत त्याची रणनीती येत्या १० दिवसात जाहीर करू आणि त्याच्यापुढची आंदोलने यशस्वी होईपर्यंत तीव्र अति तीव्र स्वरूपात होतील त्याचबरोबर येत्या काळात पाचही जिल्ह्यातील एक लाख भूमिपुत्र रस्त्यावर उतरवणार आहोत, असेही त्यांनी जाहीर केले.

**आजचे लाक्षणिक काम बंद आंदोलन हा तीव्र लढाईचा इशारा आहे. जो पर्यंत दिबासाहेबांचे नाव नाही तो पर्यंत थांबायचे नाही. लोकांच्या भावना लक्षात न घेता बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा ठराव केला पण मागणी करूनही सिडको अद्यापही ठराव भूमीपुत्रांकडे लेखी स्वरूपात का देत नाही, न्याय मिळत नाही तोपर्यंत लढा सुरूच राहणार.**

**कॉम्रेड भूषण पाटील**

सिडकोने प्रकल्पग्रस्तांच्या विरोधात कटकारस्थान केले आहे. विमान उडले नाही तर प्रकल्पग्रस्तांना काहीही फरक पडणार नाही. प्रकल्पग्रस्त, पोलीस उन्हात आणि सिडकोचे अधिकारी वातानुकूलित कार्यालयात बसले आहेत. दिबांच्या विचारांचे चिलखत आमच्याकडे आहे म्हणू एके ५६ वाल्यांनो हिंमत असेल तर पहिली गोळी मला घाला. दिबांचे नाव आणि योग्य पुनर्वसन अशा मागण्या आहेत त्या पूर्ण करा. पोलिसांना पुढे करायचे आणि आंदोलन चिरडायचे हा सिडकोचा धंदा आहे, पण आता माघार नाही तर प्रकल्पग्रस्तांना सर्वपरीने न्याय मिळत नाही तो पर्यंत हि लढाई सुरूच राहणार.

**जगदीश गायकवाड,**
**मा.उपमहापौर, पमपा**

### तो पर्यंत लढाई अधिकाधिक तीव्र केली जाईल : लोकनेते रामशेठ ठाकूर

दिबासाहेबांचे नाव आणि प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी विमानतळाचे काम बंद पाडण्याची भूमिका घेऊन आपण सर्व आलो. सिडकोला माहित होते काम बंद नाही केले तर भूमिपुत्र आंदोलक आक्रमक होईल आणि तोच धसका घेऊन विमानतळाचे काम बंद केले. ज्या स्तरावर आंदोलन होईल त्या वेळेला पुढे जाण्यासाठी युवा आणि महिला सरसावले आहेत. सर्वपक्षीय कृती समिती आणि २७ गाव समिती दिबासाहेबांचे नाव, ७९ गाव तसेच ९५ गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करीत आहे. सर्व बाबतीत सिडको चालढकल करतेय. चार दिवसापूर्वी झालेल्या सिडको सोबतच्या चार तासाच्या बैठकीत सिडकोचे अधिकारी चर्चेत फक्त वेळकाढूपणा करत होते. किती दिवस चर्चा करायची आता लढाई उत्तरोत्तर तीव्र करायची. कितीही आंदोलने करावी लागली तरी चालेल सिडकोला स्वस्थ बसू द्यायचे नाही. सिडकोच्या कार्यालयात घुसण्याची तयारी करावी लागेल. हुतात्म्यांचे रक्त वाया जात नसते वाया जाऊ द्यायचे नसते. हे दिबांनी शिकवले आहे. जो पर्यंत दिबांचे नाव आणि भूमिपुत्रांचे प्रश्न सुटत नाही तो पर्यंत लढाई अधिकाधिक तीव्र केली जाईल.

### येत्या काळात सिडकोचा चक्का जाम करायचा : आ.प्रशांत ठाकूर

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या प्रश्नावर सिडकोने डोळे बंद केलेले आहेत, ते उघडण्यासाठी हे आंदोलन उभारले आहे. तळपत्या उन्हात तहान मांडून भूमीपुत्र या आंदोलनात सहभागी झाला आहे. दिबासाहेबांनी संघर्षाचा मूलमंत्र दिला आहे, हि भूमी संघषाची भूमी आहे. प्रकल्पग्रस्तांचे हक्क संघर्षाशिवाय मिळत नाही आणि मिळाले नाहीत. सिडकोकडे एमडी, जॉईंट एमडी, आयएएस दर्जाचे अधिकारी आहेत ते फक्त बैठका घेतात पण निर्णय घेत नाहीत. हे अधिकारी दोन तीन वर्षासाठी येतात, आणि नव्याने उजळणी करत बसतात त्यांचा कार्यकाळ संपतो तो पर्यंत त्यांना प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाशी काही देणे घेणे नसते, त्या जागी पुन्हा दुसरे आले कि पुन्हा सुरुवाती पासून उजळणी सुरु असे ३० वर्षे सिडकोने वेळ मारू पणा केला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला सिडकोचे अध्यक्ष केले. त्यानंतर प्राधान्याने मी प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय आणि भूमिका घेण्याचे अधिकाऱ्यांना वारंवार सांगत आलो. त्या अनुषंगाने निर्णय झाले. साधारण दीड वर्ष मी अध्यक्ष होतो. या काळात दोन निवडणुकांच्या आचारसंहिता लागल्या. वेळ कमी मिळाला पण प्रकल्पग्रस्त स्थानिकांच्या हिताच्या दृष्टिकोनातून सकारात्मक कामे केली. पण आज पुन्हा येरे माझ्या मागल्या करत कारभार करत आहे. सिडकोला वाटतंय कोविड बचावासाठी येईल, सिडको प्रकल्पग्रस्तांना गांभीर्याने घेत नाही सिडकोकडे निर्णय क्षमता राहिली नाही त्यामुळे आंदोलनाशिवाय पर्याय उरला नाही. दिबासाहेबांचे नाव विमानतळाला लागले पाहिजे यासाठी सर्व आंदोलनात भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांचा मोठा वाटा आहे. काम बंद पाडणे आपले उद्दिष्ट नाही तर प्रकल्परस्तांच्या मागण्या पूर्ण झाल्या पाहिजेत हे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. सिडको आणि राज्य सरकार भूमिपुत्रांच्या बाबतीत गंभीर नाही हे प्रकर्षाने जाणवत आहे.आज एक दिवस लाक्षणिक आंदोलन केले पण यापुढे बेमुदत काम आंदोलन करावे लागेल आणि येत्या काळात सिडकोचा चक्का जाम करावाच लागेल, असा इशाराही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडको व राज्य शासनाला दिला.

# लक्ष्मी विजय नौकेला जलसमाधी
# चार खलाशी बचावले
## लाखो रुपयांचे नुकसान

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन जीवना बंदर येथील श्रीकृष्ण सहकारी मत्यव्यावसायिक संस्थेतील लक्ष्मी विजय नौका IND MH 3 MM 4193 जलसमाधी मिळाली. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले असुन त्या मधील चार खलाशी हे मुत्यूशी झुंज देत बालबाल बचावले.

गेल्या वर्षीप्रमाणे ह्याही वर्ष समद्रामध्ये होत असलेल्या छोट्या मोठ्या वादळामुळे मच्छीमारी ही धोक्यात आली असून. एक तर दररोज होत असलेला डिझेल, बर्फ, ऑईल, रेशनिग इत्यादी प्रत्येक फेरिचा खर्च निघत नाही. कारण मच्छिमारांना पुरेसे मासेमिळत नसल्याने मच्छीमारी हि आर्थिक संकटात सापडले आहेत.

त्यातच हे समुद्रात होणारे वादळे तश्याच प्रकारे रविवार रोजी दुपार नंतर अचानक समुद्रात मध्ये दक्षिणेकडील सोसायट्यांच्या वादळ वारे वाऱ्याला सुरूवात झाली. त्यामुळे मच्छीमार हे भयभीत होऊन आपआपल्या नौका व जीव मुठीत धरून नौका मुळगाव येथील खांडी मध्ये सुरक्षित ठिकाणी नेत असतांना वाऱ्याच्या प्रचंड वेग व समुद्राचे घेतलेल्या रौद्र रूप धारण पुढे मच्छीमारी हे हतबल झाले.

त्यांमध्येच अनिकेत लक्ष्मण रघुविर लक्ष्मी विजय नौकांचे सुकान तुटल्याने नौका भरकटली व दगडावर आदळल्याने नौकेला दांडा तरिबंदर टोकाजव जळसमाधी मिळाली. त्या नौकेमधील असले बाळकृष्ण रघुविर, जयेश रघुविर, गणेश कुलाबकर हे समुद्राच्या पाण्यानी झुंज देत बारबाला बचावले.

मात्र अनिकेत रघुविर , नौका लक्ष्मी विजय यांची नौका व जाळी, पकडून सुमारे १२ ते १५ लाख रुपयांचे नुकसान झाले. तरि सरकारने सहकार्य करावे अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील मच्छीमारी कडून केली जात आहे.

# रायगड जिल्ह्यात थंडीची हुडहुडी ; वातावरण गारठले

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

रायगड जिल्ह्यासह सुधागड तालुक्यात दोन दिवसांपूर्वी आलेल्या अवकाळी पावसानंतर गारठा अचानक वाढला आहे. सोमवारी (ता.२४) जिल्ह्यात माथेरान येथे या वर्षातील सर्वात कमी ९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. जिल्ह्यात सोमवारी (ता.२४) तापमानाचा पारा १२ अंशावर पोहचला होता. तर कमाल तापमान २४ अंशावर आले होते.

सध्या जिल्ह्यात सर्वत्र थंडीची हुडहूडी भरली आहे. थंडीपासून बचावासाठी अनेकजण गरम कपडे व शेकोटीचा आधार घेत आहेत.



दिवसभर वातावरणात गारठा जाणवत आहे. तापमानात कमालीची घसरण झाल्याने वाढत्या गारठ्यापासून बचाव करण्यासाठी ठिकठिकाणी सकाळी व संध्याकाळी लोक शेकोटी भोवती जमा झालेले दिसत आहे.

वाढत्या थंडीबरोबरच सर्दी, खोकला हे साथीचे आजार बळावत असल्याने थंडीमध्ये आरोग्याची काळीजी घेण्याच्या सुचना डॉक्टरांनी दिल्या आहेत. दिवसभर गारवा असल्याने वातावरण अगदी प्रफुल्लीत व आल्हाददायक झाले आहे. या हंगामातील कडाक्याच्या थंडीचा अनेकजण आंनद लुटत आहेत.

# शिर्की येथे शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत संपूर्ण घर जळाले

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील शिर्कि चाळ नंबर २ येथील सागरवाडीत शॉक सर्किटमुळे लागलेल्या आगीत संपूर्ण घर जळून खाक झाले. पहाटे एकविरा दर्शनासाठी निघालेले यशवंत पाटील, सुमन पाटील व भूषण पाटील यांचे सामूहिक मालकीचे संपूर्ण घर शॉक सर्किटमुळे जळाले.

सदर कुटुंबातील सर्व व्यक्ती कार्ला येथील एकविरा देवीच्या दर्शनाला घडलेल्या घटनेच्या दिवशी पहाटे ५.३० च्या दरम्यान निघाले होते. घरातून निघताना सर्व उपकरणे बंद केली होती. मात्र लाकडाचे जुने घर असल्याने व उंदीर त्रास देत असल्याने घरातील एकच बल्ब सुरू ठेवला होता. पण याच बल्बने घात करत शॉकसर्किट मुळे सकाळी ६ ते ६.३० च्या दरम्यान घराला भीषण आग लागून काही क्षणातच संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी गेला. आणि



यशवंत मारुती पाटील, सुमन मधुकर पाटील व भूषण मधुकर पाटील यांच्या सामूहिक मालकीचा शिर्कि चाळ नंबर २ वरील सागरवाडी येथील घर जळून खाक झाला.

या आगीत घरातील सर्व फर्निचर, संपूर्ण विद्युत फिटिंग, टीव्ही, फ्रीज, फॅन आदी इलेक्ट्रॉनिक वस्तू, शासकीय सर्व कागदपत्रे व भात, तांदूळ, सर्व कडधान्य आदी जीवनावश्यक वस्तू जळून खाक झाल्या.

सदर आगीची बातमी परिसरात वाऱ्या सारखी पसरताच सरपंच, सदस्य, ग्रामसेवक, तलाठी, वडखळ पोलीस आदींनी तात्काळ भेट दिली. तर पोलीस व महसूल विभागाकडून घटनेचा पंचनामा करण्यात आला. जेएसडब्ल्यू स्टील कंपनीने सीएसआर फंडातून सदर कुटुंबाला मदत करावी अशी मागणी सागरवाडी ग्रामस्थांनी केली आहे.

# प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करुन यावर्षी २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचा ७२ वा वर्धापन दिन सोहळा येथील पोलीस कवायत मैदान येथे बुधवार, दि.२६ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ०९.१५ वाजता राज्यमंत्री आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

मुख्य शासकीय सोहळ्याला गर्दी होणार नाही आणि सुरक्षित अंतराचे नियम तसेच मास्क आणि सॅनिटायझरचे नियम सर्वांनी पाळावे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे. कोरोनाची स्थिती लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारे प्रभात फेऱ्या वा इतर प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम यंदा होणार नाहीत.

या दिवशी सकाळी ०८.३० ते १०.०० च्या दरम्यान ध्वज-ारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करण्यात येवू नये.

जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ०८.३० च्या पूर्वी किंवा १०.०० च्या नंतर करावा, असेही प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

# छोट्या रणातली मोठी धुमश्चक्री

एखाद्या मोठ्या जिल्ह्याएवढा आकार आणि महापालिकेच्या वॉर्डासारखे ४० मतदारसंघ असणाऱ्या गोवा विधानसभेची निवडणूक मात्र दरवेळी साऱ्या देशाचे लक्ष वेधून घेत असते. यंदाही तसेच होते आहे. 'आया राम; गया राम' या वाक्प्रचाराने हरयाणाची पूर्वापार बदनामी होत असली तरी राजकीय आणि पक्षनिष्ठेबाबत गोव्याइतके प्रवाही आणि लवचीक दुसरे राज्य नसेल. गेल्या निवडणुकीत काँग्रेसला १७ जागांवर विजय मिळाला होता. सत्ता स्थापन करण्याचा नैतिक हक्क काँग्रेसचाच होता. मात्र, तेव्हा दिग्विजय सिंह यांची ढिलाई आणि नितीन गडकरी यांची चपळाई, यामुळे भाजपचे सरकार आले. २०१७ मध्ये बलाढ्य असणाऱ्या काँग्रेसकडे आज केवळ दोन आमदार उरले आहेत. त्यातच, गोव्यात ताकद लावून उतरलेल्या तृणमूल काँग्रेसने काँग्रेसच्या नेत्यांची पळवापळवी चालूच ठेवली आहे. केंद्रातील भारतीय जनता पक्षाचे सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर आव्हान उभे करू इच्छिणाऱ्या तृणमूल किंवा आम आदमी पक्ष यांचे छोट्या राज्यांमध्ये प्रचंड ताकद लावण्यामागचे तर्कशास्त्र समजणे कठीण आहे. गेल्यावेळीही आम आदमी पक्षाने गोव्यात उमेदवार उतरविले होते. तेव्हा डाळ फारशी शिजली नाही. यावेळी, आप सत्ताधारी होण्याच्या ईर्ष्येने उतरला आहे. त्याचवेळी, तृणमूल काँग्रेसचे (पगारी) चाणक्य प्रशांत किशोर यांनी गोव्यातील पक्षाची रणनीती ठरविली आहे. काही पक्षांनी महिन्याला १८ हजार रुपये वेतनावर किमान १५ हजार युवकांची प्रचारासाठी भरती केली आहे, असे बोलले जाते. गोव्याच्या निवडणुकीत किती पैसा ओतला जात असेल, याची यावरून कल्पना यावी. या पार्श्वभूमीवर भाजपचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना सत्ता पुन्हा राखायची आहे. गोव्याचे कार्यक्षम आणि स्वच्छ चारित्र्याचे मुख्यमंत्री दिवंगत मनोहर पर्रीकर यांच्याइतकेच डॉ. सावंत हेही स्वच्छ असल्याचा दावा केला जातो. मात्र, पर्रीकर यांनी गोव्यातील कॅथलिक समाजाला आपलेसे केले होते. त्यात सावंत यांना यश आले आहे का, हे काही दिवसांतच समजेल. त्यातच, भाजपपुढे दोन संकटे आली. पहिले, पर्रीकर यांचे चिरंजीव उत्पल यांचा बंडाचा झेंडा. उत्पल यांना हवा तो मतदारसंघ देता आली नाही, हे एकवेळ समजू शकते. पण त्यांची समजूत पक्षाला काढता आलेली नाही. आज पणजीत सगळेच विरोधी पक्ष उत्पल यांना संयुक्त उमेदवार म्हणून घोषित करण्याच्या विचारात दिसतात. तेथे अतानाशिओ (बाबूश) मोन्सेरात यांच्यासारख्या सर्व अर्थांनी शक्तिशाली असणाऱ्या नेत्याला डावलणे भाजपला शक्य झालेले नाही. उलट मोन्सेरात आणि विश्वजित प्रतापसिंह राणे यांना भाजपने सपत्नीक उमेदवारी दिली आहे. उपमुख्यमंत्री चंद्रकांत कवळेकर आणि त्यांची पत्नी सावित्री हे तिसरे मेहुण मात्र भाजपने पंगतीला न बसवल्याने सावित्री कवळेकर यांनी बंड केले आहे. गोव्याला तसाही घाऊक पक्षांतरे, बंडखोरी आणि एकदा का निवडणूक पार पडली की होणाऱ्या तडजोडी, युती आणि आघाड्या यांचा इतिहास आहे. त्यामुळे, आज भाजपमधून बाहेर पडणाऱ्या नाराज नेत्यांची रांग लागली असली तरी उद्या यातले निवडून येणारे क्षणात उलटे फिरू शकतात. माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर हे भाजपचे ज्येष्ठ नेते. पण तिकीट न मिळाल्याने त्यांनी पक्षाचा राजीनामा देऊन अपक्ष म्हणून लढण्याचे जाहीर केले आहे. पण २०१७ मध्ये ते पराभूत झाले होते. गोव्यात आता भाजप आणि आप हे दोनच पक्ष सगळ्या जागा लढविणार आहेत. तृणमूल काँग्रेसने महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाशी, शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेसशी आणि काँग्रेसने गोवा फॉरवर्ड पार्टीशी आघाडी केली आहे. खरेतर, तृणमूल व काँग्रेस यांनी युती करायला हवी होती. मात्र, इतक्या छोट्या राज्यात ममता बॅनर्जी आणि राहुल गांधी यांनी एकाच दिवशी येऊन परस्परांची भेट न घेता एकमेकांवर टीका करण्यात धन्यता मानली. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात केवळ २१ ते ३७ हजार या दरम्यान मतदार असल्याने निवडून येण्याचे ठोकताळे अनुभवी नेत्यांनी बसविलेच आहेत. त्यामुळे, मतदारांना जिंकण्याइतकेच त्यांनी निवडून दिलेले आमदार नंतर जिंकून घेणे, हे मोठ्या पक्षांना सोयीचे असते. मनोहर पर्रीकर हे राज्यात राजकीय स्थैर्य आणि त्या अनुषंगाने येणारी प्रशासकीय स्थिरता राखणारे गेल्या अनेक दशकांमधले एकमेव नेते होते. डॉ. प्रमोद सावंत यांना हे जमते का, ते या निवडणुकीतून समजेलच. आपण या राजकीय दलदलीत फसलेलो नसून उलट गोव्याला त्यातून बाहेर काढणार आहोत, अशी उच्च नैतिक भूमिका आम आदमी पक्षाने घेतली आहे. ती भूमिकाही गोव्याच्या सुशिक्षित मतदारांना किती भावते, हेही आता कळेल. गोव्यातील लोक 'आपला आणि बाहेरचा' हा निकष बऱ्याचदा लावतात. हा अडथळा ओलांडण्यात ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांना कितपत यश येते, हेही या निमित्ताने समजणार आहे.

# शिवसेना नविन पनवेल शहरप्रमुख यतिन देशमुख यांचा कामाचा जोरदार धडाका ; आरोग्य शिबिरासह पक्ष प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने तसेच मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे आणि रायगड जिल्हा प्रमुख शिरीषदादा घरत यांच्या आशीर्वादाने तसेच पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल यांच्या मार्गदर्शनाने आणि नविन पनवेल शहर प्रमुख यतिन विनायक देशमुख, शहर संघटिका सौ. अपूर्वा प्रभु, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, विभाग प्रमुख किरण सोनावणे यांच्या पुढाकाराने शिवसेना नविन पनवेल शहर आणि एस एन आय हॉस्पिटल यांच्या सौजन्याने शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन आणि मोफत डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी इतर पक्षातून संदेश वाघमारे, तुषार चौधरी, अक्षय मोकल, हरिदास सावंत, प्रवीण मोहिते, महेश करडे, वसीम शेख, साईराज मंडले, मिलन कटेलिया, कुश बडोनी, एलन पाल, सचिन कीर्तने, विकास संदीपोग, आदिश एम.एस., अखिल वेनू, अखिल पिल्लई, रणजित रेमेशान, निखिल पी. अमोल, प्रमोद राजपूरे, मनीष, अश्विन, मिथून यांनी शिवसेनेत जाहिर प्रवेश केला.

या कार्यक्रमाला उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, सल्लागार बबनदादा पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, तालुका संघटक भरत पाटील, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, भारतीय कामगार सेनेचे अभय प्रभू, तालुका युवा अधिकारी पराग मोहिते, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, किरण तावदरे, महिला उपजिल्हा संघटिका सौ. कल्पनाताई पाटील, महिला विधानसभा सांघटिका सौ.रेवती सकपाळ, तालुका महिला संघटिका ग्रामीण मेघाताई दमडे, विभाग प्रमुख बिपिन झुरे, विचुंबे विभाग विशाल भोईर, उपविभाग प्रमुख राजेश वैंगणकर, संजय भोसले, अविनाश गव्हाणकर, शहर अधिकारी जितेंद्र सिद्धू, संदीप तांडेल, सिद्धेश गुरव, सतीश गायकर, नंदू खोत, खडकबन, नागेंद्र कावळे, गणेश शिंदे, सौ. संचीता राणे, सौ.नम्रता शिंदे, मंगल नाडार, सौ. वैशाली थळी, सौ. शारदा पाटील, सौ. ज्योती पाटील, सौ. सुगंधा शिंदे, सौ. अर्चना पाटील, सौ. गीता राजगुरू, सौ. तनुजा झुरेहे उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्याच्या वार्षिक योजनेसाठी उपमुख्यमंत्र्यांनी मंजूर केला २२५.४४ कोटींचा निधी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यासाठी सन २०२२-२३ या वर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेसाठी (सर्वसाधारण) सुमारे २२५.४४ कोटी रुपयांच्या आराखड्यास उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात झालेल्या राज्यस्तरीय नियोजन बैठकीत मंजूरी दिली. यावेळी चर्चा होऊन विविध योजनांना जिल्ह्यासाठी २०१.१५ कोटींच्या अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली. सन २०२२-२३ अंतर्गत आराखड्यावर चर्चेअंती रु.३००.०० इतका निधी मंजूर करण्यात आला असून यामध्ये रायगड प्राधिकरणासाठी रु.५.०० कोटी इतक्या निधीचा समावेश आहे.

यावेळी खासदार सुनिल तटकरे, जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यावेळी उपस्थित होते. तर आमदार सर्वश्री रविंद्र पाटील, भरत गोगावले, महेंद्र दळवी, अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. दरम्यान, दि. १२ जानेवारी रोजी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सन २०२२-२३ या वर्षाच्या आर्थिक वर्षाकरिता (सन २०२२-२३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) साठी यंत्रणांची मागणी रु.५५०.६१ कोटी व त्यानुषंगाने जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिलेला आराखडा रु.२२५.४४ कोटी इतका आहे. अनुसूचित जाती उपयोजना सन २०२२-२३ करिता यंत्रणांची मागणी रु.२६.७० कोटी असून जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिलेला आराखडा रु.२५.६४ कोटी इतका आहे. तर आदिवासी उपयोजना सन २०२२-२३ करिता यंत्रणांची मागणी रु.६२.४९ कोटी असून जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिलेला आराखडा रु.३४.०६ कोटी रुपयांचा आहे. अशी एकूण यंत्रणांची मागणी रु.६३९.८० कोटी असून जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिलेला आराखडा रु.२८५.१४ कोटी इतका आहे, असे यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी यावेळी सांगितले.

सर्व खासदार, आमदार, नियोजन समिती सदस्य व सर्व अधिकारी यांनी हा निधी जिल्ह्यातील विकास कामांवर विहीत कालावधीत खर्च करावा. या कामांतून जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक यांचे जीवनमान उंचाविण्याच्या दृष्टीने कामे व्हावीत, अशी अपेक्षा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी यावेळी व्यक्त केली. रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या छोट्या-मोठ्या पूलांचे, साकवांचे झालेले नुकसान, महावितरण विद्युत पुरवठा बाबत कायमस्वरुपी उपाययोजना, दरडप्रवण गावांचे सर्वेक्षण, पिक विमा योजना, अतिसंवेदनशील गावांचे पुनर्वसन, कोविड प्रतिबंधात्मक करण्यात आलेल्या खर्चांची अंमलबजावणीसाठी भविष्यात मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करून अजून निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी प्रारुप आराखड्यासंदर्भात व जिल्ह्यातील नाविण्यपूर्ण उपक्रमांबद्दल सादरीकरण केले. या प्रकल्पांचे उपमुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

# कर्जत बेकरे गावात बिबट्याचा वावर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील बेकरे गावात रात्रीच्या सुमारास बिबट्याचा वावर असल्याचे काही ग्रामस्थांना दिसून आल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.त्यामुळे या बिबट्याचा वनखात्याने बंदोबस्त करावा अशी मागणी आता पुढे येत आहे. गेल्या काही महिन्यात बेकरे गावात शेतकऱ्यांच्या बकऱ्या ह्या गायब झाल्याचे समोर आले होते. अचानक गेली दोन दिवस ज्या गोष्टीचा भास सतत ग्रामस्थांना होत होता तो बिबट्या शनिवार दिनांक २२ जानेवारी रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास बेकरे गावातील राहणारे ग्रामस्थ यांना दिसून आल्याने,परिसरात एकाच खळबळ उडाली होती.



सौ.शारदा सुनील पेठे

यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक : पेठे परिवार

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची भातशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.गदल्या बारक्या पाटील, सौ.नागुबाई बारक्या पाटील, सौ.मंदा बारक्या पाटील सर्व रा.पेठाली, ता.उरण, जि.रायगड यांजकडून, कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. तीचे वर्णन खाालीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| किरवली (आडीवली) ता.पनवेल, जि.रायगड | ७६ | ०-३१-१० पो.ख. ०-०१-०० | ०६.८१ |
| किरवली (आडीवली) ता.पनवेल, जि.रायगड | ७७ | ०-६०-२० | १२.३७ |

वरील वर्णनाचे मिळकतीचे बाबत कोणा व्यक्तीचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दान, गहाण, बोजा, लीज, फरोक्तखत असल्यास तसेच त्यांची आमचे अशिलांच्या मुळ मालकांबरोबरच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित इसमांनी अगर संस्थांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात व पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे त्यांचे नमूद पत्यावर कळवावी. वरील मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत खालील सही करणार यांचेकडे लेखी स्वरुपात न कळविल्यास वरील वर्णनाचे मिळकतीशी कोणीही व्यक्ती अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही, तसेच आमचे अशिलांचे खरेदी व्यवहारास कोणत्याही प्रकारची हरकत नाही व असल्यास ती त्यांनी सोडून दिली आहे, असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व व्यवहारानंतर कोणी कुठल्या प्रकारची हरकत घेतल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, कळावे

पनवेल
दि.१७/०१/२०२२

सही/-
संतोष एकनाथ म्हात्रे
ॲडव्होकेट
धनश्री, कामत आळी, अलिबाग-रायगड
मो.नं.९४२११५९१०९

ॲड.तनुजा पं. पिंपरकर

## जाहीर नोटीस

कर्जत येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.०३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता. २५/०२/२०२२

१) श्रीम.कुलसुम फकिरमहमंद जालगांवकर
वय : ६९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.स्वप्नदिप अपार्टमेंट, डेक्कन जिमखाना,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
२) सौ.फरिदा अनिस कर्णेकर
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.पारा मोहल्ला, मुसलमान नाका, रुम नं.३०५,
मुनिरा बुबेरे चाळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीम.शगुप्ता फकिर महमंद जालगांवकर
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.स्वप्नदिप अपार्टमेंट, डेक्कन जिमखाना,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
४) श्रीम.बिलकिस फकिर महमंद जालगांवकर
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.स्वप्नदिप अपार्टमेंट, डेक्कन जिमखाना,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
५) श्री.खलील फकिर महमंद जालगांवकर
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.स्वप्नदिप अपार्टमेंट, डेक्कन जिमखाना,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी १) श्रीम.कुलसुम फकिरमहमंद जालगांवकर, २) सौ.फरिदा अनिस कर्णेकर, ३) श्रीम.शगुप्ता फकिर महमंद जालगांवकर, ४) श्रीम. बिलकिस फकिर महमंद जालगांवकर व ५) श्री.खलील फकिर महमंद जालगांवकर यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी चौ.अर्ज क्र.०३/२०२२ दाखल केला आहे. सदरहू अर्जामध्ये अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील कै.फकिर महमंद अबुबकर जालगांवकर हे मौजे : कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड येथील रहिवासी असून ते दि.१४/०६/२०२१ रोजी मौजे : कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड येथे मयत झाले असून अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत असे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांनी अर्ज केला आहे.

कै.फकिर महमंद अबुबकर जालगांवकर यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणे गरजेचे आहे.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांना वारस दाखला देण्याबाबत संबंधित नातेवाईक, हितसंबंधित व इतर यांची काही हरकत असल्यास त्यांनी कागदपत्रांसह तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत दि.२५/०२/२०२२ पूर्वी या न्यायालयात दाखल करावी जर मुदतीमध्ये कोणतीही हरकत किंवा तक्रार न आल्यास अर्जदारांना त्यांच्या विनंतीनुसार वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस आज दि.१७/०१/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/-
क.लिपीक
दि.न्याया. कर्जत

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्याया. कर्जत

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सुचना देण्यात येते की, माझे अशिल मदन बापू गोंधळी रा.मु.बागाळी, पोस्ट दहिसर, तालुका जिल्हा : ठाणे ४००६१२ लिहून घेणारे यांनी लिहून देणारे महिंद्रा मोहन चिमणे राहणार : ६२५/बी, कराडी समाज मंदिर जुई, कामोठे, नवी मुंबई यांच्याकडून खालील वर्णन केलेली शेतजमीन विकत घेण्याची ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बेलोंडाखार, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ६८ | ६ | ०-३७-२० पो.ख. ०-११-५० एकूण क्षेत्र ०-४८-७० | ३.६२ |
| २ | ६८ | २ | ०-५३-०० पो.ख. ०-०६-६० एकूण क्षेत्र ०-५९-९० | ६.५६ |
| ३ | ७२ | ५ | ०-३८-४० पो.ख. ०-०१-६० एकूण क्षेत्र ०-४०-०० | ६.१४ |
| ४ | ७१ | ६ | ०-०४-६० पो.ख. ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-०५-६० | ०.५६ |
| ५ | १०९ | २ | ०-२०-२० पो.ख. ०-००-५० एकूण क्षेत्र ०-२०-७० | २.७५ |
| ६ | १९ | ४ | ०-०७-०० पो.ख. ०-००-९० एकूण क्षेत्र ०-०७-९० | ०.६९ |
| ७ | १८ | १ | ०-७३-७० पो.ख. ०-०९-३० एकूण क्षेत्र ०-८३-०० | ०.०६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

दि.२४/०१/२०२२

सही/-
ॲड.सुजाता जो.पाटील
विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,
खारघर, नवी मुंबई-४१०२१०
मो.नं.८८७९४१६४८३

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

### ई-निविदा सूचना

**पनवेल महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता प्रिंट, झेरॉक्स मशिन, कागद, शाई व मनुष्यबळासह एक वर्षासाठी प्रिंट, झेरॉक्स काढून व नकाशे काढून पुरविणेबाबत या कामाची ई-निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेलकडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल mahatendersg.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.**

**पमपा/मातंवि/२१२१/प्र.क्र.२७/४६४/२०२२**
**दिनांक : २४/०१/२०२२**

**सही/-**
**(विठ्ठल डाके)**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## ग्रुप ग्रामपंचायत तळेखार

**मु.तळेखार, पो.चोरढे, ता.मुरुड (जंजिरा), जि.रायगड**

जा.क्र.३०८/२०२२ — दिनांक : २४/०१/२०२२

### जाहीर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत तळेखार हद्दीतील सर्व ग्रामस्थांना कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत तळेखार सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन व १५ वा वित्त आयोग या योजनेंतर्गत सन २०२१-२२ कामाचे खालील प्रमाणे कामांसाठी सिलबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा | फॉर्म मिळण्याची तारीख व वेळ | निविदा स्वीकारण्याची तारीख व वेळ | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे : तळेखार येथे सार्वजनिक शोषखड्डा, प्लास्टीक संकलन केंद्र सार्वजनिक कंपोस्ट पिट | स्वच्छ भारत मिशन अभियान (ग्रामीण) सांडपाणी व घनचकरा व्यवस्थापन | २८२७३९/- | २८२७/- | १००/- | ३१/०१/२०२२ वेळ : सायंकाळी १० ते ११ | ३१/०१/२०२२ दुपारी १२.०० ते २.०० | ३०/०४/२०२२ |
| २ | मौजे : तळे येथे सार्वजनिक शोषखड्डा, प्लास्टीक संकलन केंद्र सार्वजनिक पोस्ट पिट | स्वच्छ भारत मिशन अभियान (ग्रामीण) सांडपाणी व घनचकरा व्यवस्थापन | १८३६८४/- | १८३७/- | १०० /- | ३१/०१/२०२२ वेळ : सायंकाळी १० ते ११ | ३१/०१/२०२२ दुपारी १२.०० ते २.०० | ३०/०४/२०२२ |

अटी व शर्ती :-

१) सदर कामांचे अंदाज पत्रक कार्यालयीन वेळेत ग्रा.पं.कार्यालयात पहावयास मिळतील. आवश्यक असल्यास फी भरुन त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
२) निविदा व इसारा रक्कम स्वीकारण्याचा दि.३१/०१/२०२२ रोजी दुपारी १२.०० ते २.०० या वेळेत घेण्यात येतील.
३) प्राप्त निविदा दि.३१/०१/२०२२ रोजी संध्याकाळी ४.०० वा. ग्रुप ग्रामपंचायत तळेखार कार्यालयात उपस्थित सक्षम मा.सरपंच यांचे हस्ते उघडण्यात येतील व बिलाची रक्कम ग्रामपंचायत कडील तरतुदीनुसार अदा करण्यात येईल.
४) निविदा सोबत ठेकेदाराने नोंदणीची सत्यप्रत जोडावी व प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा भरण्यात यावी.
५) सुरक्षा अनामत रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.
६) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर व उपकराची रक्कम पात केली जाईल.
७) काम अंतिमरित्या झाल्यानंतर ६ महिने देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदाराने करण्याचे असून त्यानंतर सुरक्षा अनामत कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
८) सविस्तर अटी व शर्तीकरिता ग्रामपंचायत कार्यालयाकडे संपर्क करावा.
९) नोंदणीकृत ठेकेदार न मिळाल्यास अनुभवी स्थानिक ग्रामस्थांचा विचार केला जाईल.
१०) कोणतेही एक किंवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच ग्रुप ग्रामपंचायत तळेखार यांनी राखून ठेवला आहे.
११) पोस्टाने आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत तळेखार**
**ता.मुरुड, जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत तळेखार**
**ता.मुरुड, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नांदगावच्या नूतन स्कूल ऑफ नर्सिंगचे सुयश

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्था संचलित नूतन स्कूल ऑफ नर्सिंग स्कूलचा द्वितीय वर्षाचा निकाल उल्लेखनीय असा लागलेला असून यामध्ये कु.प्रणिता किसन पनवेलकर हिने प्रथम क्रमांक, कु.गायत्री नितीन नाईक हिने द्वितीय तर कु.कल्याणी राजेंद्र कडवे हिने तृतीय क्रमांक मिळविल्याबद्दल सर्वत्र कौतुक व समाधान व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्था संचलित नूतन स्कूल ऑफ नर्सिंग संस्थेच्या अध्यक्षा डॉ.नुतन माळी,सचीव डॉ.रामलिंग माळी, व्यवस्थापक तुषार दिवेकर तसेच नर्सिंग स्कूलचे प्राचार्य विजय उबाळे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे यशस्वी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन लाभले.

## माजी नगराध्यक्ष निलेश सुतार यांनी केले कुराण ठेवण्याच्या बॅगेचे वाटप

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरचे माजी नगराध्यक्ष निलेश सुतार यांच्याकडून हिंदूहृदयस्रम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे जयंती निमित्त शिवाजीनगर मोहल्ला येथील पन्नास मुस्लीम बालकांना कुराण ठेवण्याच्या बॅगेचे वाटप करण्यात आले.

नुकत्याच झालेल्या नगरपंचायत निवडणुकीवेळी ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या शिवसेनेच्या ब्रीदवाक्यानुसार समाजसेवा करण्यासाठी माजी नगराध्यक्ष निलेश सुतार यांनी ग्वाही दिली होती. त्यानुसार सुमारे पन्नास मुस्लीम बालकांना कुराण ठेवण्याच्या बॅगेचे वाटप माजी शहरप्रमुख सुरेश पवार यांच्या उपस्थितीत निलेश सुतार यांनी केले. याप्रसंगी नवनियुक्त शहरप्रमुख प्रकाश गायकवाड, अमरदीप नगरकर, मंगेश नगरकर, शैलेश तलाठी, मुराद वारोसे, रामभाऊ भूतकर, नवनिर्वाचित नगरसेवक विनायक दिक्षीत व सिध्देश शेठ तसेच शिवसैनिक आणि मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृतीस्थळावरून हिंदुहृदयसम्राट ज्योत कळंबोलीत दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्यासह शिवसैनिक शिवाजी पार्क येथील स्मृतीस्थळी जमले. यावेळी मुंबईच्या महापौर किशोरीताई पेडणेकर यांच्याहस्ते हिंदुहृदयसम्राट ज्योतीला प्रारंभ करून पनवेलच्या दिशेने रवाना करण्यात आली.

रोहिंजण येथील सूनित कृष्णा पाटील यांच्या संकल्पनेतून या ज्योतीचे गेले ७ वर्षे नियोजन करण्यात येत असते. मात्र यावर्षीच्या हिंदुहृदयसम्राट ज्योतीचे नियोजन पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक मॅरेथॉनची पारितोषिके पटकाविणाऱ्या कमळ्या (कमलाकर) भगत यांनी ३५ किलोमिटर अंतर एकटेपणाने पार करण्याचा निश्चय साकार केला.



स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या अस्थींचे रायगड जिल्ह्यात आणत असताना सर्वप्रथम शिवतीर्थ ते कळंबोली असे आगमन झाले होते, त्यावेळेपासून गेली ७ वर्षे बाळासाहेब ठाकरे यांची ज्योत आणण्याचा पायंडा सुरू झाला. यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत, रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, विधानसभा संघटक दीपक निकम, पनवेल तालुका संघटक भरत पाटील, पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, आयोजक पनवेल तालुका समन्वयक प्रदीप ठाकूर आणि सुमित कृष्णा पाटील, महानगरप्रमुख रामदास शेवाळे, महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील, उप महानगरप्रमुख दीपक घरत, शहर प्रमुख प्रकाश गायकवाड, माजी शहरप्रमुख खारघर शंकरशेठ ठाकूर, कळंबोली शहरप्रमुख डी.एन.मिश्रा आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी हिंदुहृदसम्राट ज्योतमध्ये सहभागी होणाऱ्या पदाधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती लाभली. यामध्ये संदीप पाटील, विशाल पवार, जयेंद्र पाटील, जयेंद्र पाटील, महेश मढवी, दिनेश म्हात्रे, सचिन म्हात्रे, विकास पाटील, अमित पाटील, बारक्या पाटील, सुमित पाटील, धीरज पाटील, राकेश पवार, दीपक पाटील, महेंद्र पाटील, ऋषी पाटील, करण पाटील, अक्षय पाटील, परेश हाळे, चंद्रकांत, सिद्धू म्हात्रे, बाळाराम गायकवाड, रोशन पाटील, मकरंद घरत, राजा म्हात्रे, नरेश ढाले, मोहीम शेख, मंगेश खांडगे, गणेश खांडगे, स्वयम खांडगे, भरत शिंदे, संतोष सहाणे, मल्हार खांडगे, चेतन देवराय, कामेश थोरात, राजेश केणी, निकेश घरत, सचिन मोरे, संजय शेडगे, कृष्णकांत कदम, सुरेश भगत, जगन भगत, पप्प्या पारधी, नरेश भगत आणि कमलाकर (कमळ्या) भगत आदींसह शिवसैनिक उपस्थित राहिले होते.

## मनसे तर्फे पेण येथे हळदीकुंकू कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना तर्फे पेण येथे हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मनसे महिला तालुका अध्यक्ष निकिता रुपेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गांधी मंदिर सभागृहात हळदीकुंकू कार्यक्रम संपन्न झाले.



सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण, मनसे महिला सेना जिल्हाध्यक्ष सपना देशमुख, उपाध्यक्ष छाया शिंदे, महिला तालुका अध्यक्ष निकिता पाटील, पेण तालुका सचिव रेखा तांडेल, जोहे ग्रामपंचायत सदस्य भाग्यश्री पाटील, नाजिया मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना उपविभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण म्हणाल्या की, सर्वच महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून राजकारणात सक्रिय झाले पाहिजे. समाजात महिला शक्ती सर्वच गोष्टीत आघाडीवर आहे. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात सहभाग घेऊन स्वतःला सिद्ध केलं पाहिजे. सदर कार्यक्रमास मनिषा पाटील, कविता पाटील, पूर्व विभाग अध्यक्ष हिना मुजावर, पेण तालुका उपाध्यक्ष पुजा शेलार, कासु विभाग अध्यक्ष नीलिमा पाटील, संगिता पाटील, नयना पाटील, सुप्रिया पाटील, प्रिया पाटील, नंदा पाटील, पल्लवी पाटील, मानशी पाटील, अपर्णा पाटील, भारती पाटील, गौरी मॅडम, सोनाली पवार, निकिता म्हात्रे, निलम शर्मा, वैशाली पाटील, अनुजा पाटील यांसह मनसेच्या महिला पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## पनवेलच्या मातीतील कलागुणांना रंगरचना कलामंचाने करावे : संजय पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलच्या मातीती परमेश्वराने इतक्या कलागुणांची पेरणी आहे त्यांची व्यवस्थित नांगरनी करून जगाच्या पटलावर आणून त्यांच्या सामर्थ्याची माहिती जगाला करून दिली पाहिजे हे काम रंगरचना कलामांचाने करावे असे प्रतिपादन पनवेलचे प्रसिद्ध चित्रपट लेखक व गीतकार तसेच राज्य मराठी विकास संस्था मराठी भाषा संचालक संजय कृष्णाजी पाटील यांनी पनवेलमध्ये शनिवारी केले ते 'रंगरचना कलामंच 'या संस्थेच्या उदघाटनपर कार्यराक्रमात कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतातून बोलत होते.यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेते व कास्टिंग डायरेक्टर विश्वास नवरे, के वी कन्या विद्यालयाच्या प्राचार्या श्रीम वैशाली वळवी ,महाड पोलादपूर रहिवाशी संघाचे अध्यक्ष चंद्रकांत पवार उपस्थित होते.

पणवेलमधील जुन्या जाणत्या नाट्यवेड्या किशोर जोशी , शंकर वाडेकर,कमलाकर वैश्यमपायन यांच्या भावुक आठवणी काढत चंद्रशेखर सोमण यांच्या 'सूर्याची पिल्ले' या संस्थेचा उल्लेख करून अनेक आठवणींना उजाळा देत काका देशमुख , रतनू पारखी , आणि आजही तरुण असलेल्या आपला नाट्यसहकारी मनोहर लिमये आणि इतर मित्रांसोबत महाराष्ट्रातील अनेक नामवंत एकांकिका स्पर्धात मिळवलेली बक्षिसे किती मोलाची होती हे बोलताना ते पुढे म्हणाले की आज मी ऑक्सर कमिटीवर ज्युरी म्हणून काम केले . माझ्या जोगवा,काकस्पर्श चित्रपटाला आणि त्यातील गाण्यांना अनेक पुरस्कार मिळाले त्याहीपेक्षा सोलापूरमध्ये आमच्या एकांकिकेला शशिकपूर साहेबांच्या हस्ते मिळालेलं पारितोषिक खूप मोलाचं आहे. माझी घडणावळ पनवेलमध्ये झाली. नोकरी करून एकांकिका करायचो त्यासाठी वर्गणी काढायचो,वडापाव खाऊन एकांकिका केल्याचा आनंद खुप मोठा होता.अनेक कर्तृत्ववान लोकांनी पनवेलची रंगभूमी समृद्ध केली हे सांगतानाच बालनाट्यासाठी कल्पनाताई कोठारी यांनी दिलेल्या योगदानाबद्दलही ते बोलले कल्पनाताईंच्या प्रपोजल नाटकाने इतिहास घडवला . रंगरचनाचे प्रमुख विजय पवार, सचिन पाडळकर यांनी नाटक , सिनेमा, मालिका आणि कलेच्या इतर प्रकारांना प्रेरणा द्यावी असा मानसही व्यक्त केला.

यावेळी अभिनेता व कास्टिंग डायरेक्टर विश्वास नवरे म्हणाले की रंगरचना कलामंच च्या माध्यमातून आलेल्या पवेलमधील कलाकारांना नवीन मालिकांमध्ये नक्कीच संधी मिळेल पण आपल्याकडे नाटकाची बैठक असायला हवीच,बोलीभाषाही आपली असली तरी प्रमाणभाषेवर आपलं प्रभुत्व असणं आवश्यक आहे.नाटकाची भाषा आणि तंत्र आपल्याला समजायला हवे, हे गणित ज्याला जमलं त्याला सामर्थ्यशाली कलाकार व्हायला वेळ लागणार नाही. महाड पोलादपूर रहिवाशी संघाचे अध्यक्ष चंद्रकांत पवार यांनीही आपलं मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला अभिनेता व लेखक निनाद शेट्ये, अभिनेता नितीन नारकर , मकरंद मराठे, दीपक म्हात्रे , रामप्रहरचे संपादक देवदास मटाले पनवेलमधील अनेक कलाकार उपस्थित होते.

## वृद्ध महिलेचे दागिन्यांसह रोखरक्कम केली लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्रीमती माधवी नलावडे (वय-७०) या से.-३ येथून पायी घरी जात असताना त्यांना रस्त्यात थकवा आल्याने त्यांनी त्यांच्या हातातील व काखेतील पर्स व दोन पिशव्या खाली ठेवून बसल्या असताना त्यांच्या न कळत अज्ञात वस्तूंनी त्या पिशव्यांमधील असलेले रोखरक्कम, दागिने व मोबाईल फोन व इतर कागदपत्रे असा मिळून जवळपास २५ हजारांचा ऐवज चोरल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.


### महाराष्ट्र शासन

**रायगड पाटबंधारे विभाग कोलाड, ता.रोहा, जि.रायगड**

web-kidc.maharashtra.etenders.in & gmail-eerid24@gmail.com

**ई-निविदा सूचना क्र.८ सन २०२१-२२ (दुसरी मागणी)**

कार्यकारी अभियंता रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड (दूरध्वनी क्र.०२१९४/२५०८५७) महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा खात्याकडे प्रस्तावित खालील कामांकरिता सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुनयातील निविदा ई-प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची निविदा किंमत | इसारा/बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भिरा प्रकल्पांतर्गत (ता.माणगांव, जि.रायगड) दक्षता व देखभालीसाठी कुशल व अकुशल मजूर, तारतंत्री व सुरक्षा पुरवठा करणे | २२९८३३८/- (GST वगळून) | २३०००/- | १२ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- २३६०/- (ना-परतावा) | वर्ग ५ अ व त्यावरील |

१) कोरा सक्षमता दस्तऐवज महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२५/०१/२०२२ ते ३१/०१/२०२२ या कालावधीत १८.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

२) निविदाकारांवर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन संदर्भात व डिजिटल प्रमाणपत्र वितरित करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील टोल फ्रि दुरध्वनी १८०० ३०७० २२३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

३) एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेला आहे.

टिप :- निविदा भरताना आपले दर GST वगळून भरणे बंधनकारक आहे. GST चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

सही/-
(इंजि.राकेश धाकतोडे)
कार्यकारी अभियंता
रायगड पाटबंधारे विभाग,
कोलाड

क्र.जिमाका/राअ/जाहि/२१०/२०२१-२२



### जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री.कुलदीप सेंगर रा.३०३, नवीन स्प्लेंडर को.ऑप.हौ. सो.लि., ए विंग, सेक्टर नं.६, भूखंड नं.१७, खांदा कॉलनी, नवी मुंबई-४१०२१० यांचेद्वारे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की,

आमचे अशिलांनी श्रीमती.छबुबाई तुकाराम चव्हाण यांचेकडून खांदा कॉलनी येथे मंगलमुर्ती टॉवर को.ऑप.हौ.सोसायटी लि.मधील शॉप नं.११, बी विंग, प्लॉट नं.०३, सेक्टर ११ हा व्यावसायिक गाळा विकत घेतला आहे. सदर मिळकतीचे खालील वर्णन केलेल शेअर सर्टीफिकेट दि.०५/०१/२०२२ रोजी खांदेश्वर रेल्वे स्टेशन ते खांदा कॉलनी येथे आम्ही रिक्षा मधून सकाळी ११.०० वाजता प्रवास करताना आमचे अशिलांकडून हरविले आहे.

**शेअर सर्टीफिकेटचे वर्णन**

**शेअर होल्डरचे नाव : श्रीमती.छबुबाई तुकाराम चव्हाण**

**शेअर सर्टीफिकेट नं. : ७०६९**

**शेअर सर्टीफिकेट देणाऱ्या सोसायटीचे नाव : मंगलमुर्ती टॉवर को.ऑप.हौ.सोसायटी लि.**

**शेअर सर्टीफिकेट देणाऱ्या सोसायटीचे नोंदणी क्रं. :** MBOM/CIDCO/HSG (OH)/2113/JTR/2005/2006

**को.ऑप.हौ.सोसायटी लि.**

**शेअर सर्टीफिकेट दिल्याची तारीख : १७/०१/२००६**

**शेअर कॅपिटल : रु.१०००००/-**

**शेअर कॅपिटल रजि नं. : २११३**

सदर वर वर्णन केलेल्या शेअर सर्टीफिकेटची प्रत जर कुणाला सापडली तर खालील पत्यावर आणून द्यावी अथवा संपर्क साधावा.

दि.२३/०१/२०२२
ठिकाण : पनवेल

सही/-
अॅड.उदय प्रकाश मोकल
पत्ता : मु.पो.चिरनेर,
ता.उरण, जि.रायगड



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलाने खरेदीखत करून प्रस्ताविक जमीन मालक श्री.मारुती विठू मढवी या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर वर्णित जमीन मिळकत ही श्री.मारुती विठू मढवी यांच्या प्रत्यक्ष वहिवाटीत व ताबे कब्जात आहे. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : उमरोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| उमरोली | ३७/२ | ०-०५-०० | ०.१२ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.२४/०१/२०२२

सही/-
अॅड.श्री.महेंद्र अनंता पाटील
मो.नं.९८२०७९५६०५



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे : मोहो, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील पुढील तक्त्यात नमूद केलेली मिळकत सौ.केतकी राहूल अन्वीकर रा.फ्लॅट नं.जे.०३, स्टर्लींग हौ. सोसायटी, सेक्टर १, रोड नं.१८, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीची असून सदर मिळकतीचे आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखत करून त्यांचेकडून घेण्याचे ठरविले आाहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : मोहो, ता.पनवेल, जि.रायगड**

| गांव | सर्व्हे नं./ गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मोहो | ६६ | १ क | ०-०६-५० | १.०६ |

ज्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागावर तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु. हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट हिस्सा अगर तत्सम कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास अशा हितसंबंधी व्यक्ती संस्था इ.त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आमच्या खालीलप्रमाणे पत्यावरील कार्यालयात सादर करावे. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत सौ.केतकी राहून अन्वीकर यांचा मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, असे सर्व जाहीर असावे.

पनवेल
दि.२५/०१/२०२२

सही/-
अॅड.अवंतिका भ.देशकर
ऑफिस नं.१३, पहिला मजला,
यशोकिरण बिल्डींग, लोखंडीपाडा,
पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९३२४०५८५१६



अॅड.निलीमा मगर
अॅड.वैशाली सुलेभाविकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.६०/२०२२
नि.नं.७/ड

श्रीमती.ललिता रामदास मगर उर्फ
सौ.ललिता दत्तात्रय तुपे — अर्जदार
विरुद्ध
जिल्हा परिषद रायगड
ग्रामपंचायत नेरे — सामनेवाला

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार हे श्रीमती.ललिता रामदास मगर उर्फ सौ.ललिता दत्तात्रय तुपे यांचा जन्म दि.२०/१०/१९६५ रोजी मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेला आहे.

सदर जन्माची दाखला आवश्यक असल्याने अर्जदार यांनी मे.फौजदारी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्याबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या कालावधीत मे.कोर्टात हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. वर नमूद कालावधीत हरकत न आल्यास अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल



मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

अर्जदारांतर्फे वकील
अॅड.देवेंद्र बोडरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.११४०/२०२१
ने.ता. २९/०१/२०२२

श्री.रामदास हरिचंद्र पाटील — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक सो नितळस ग्रामपंचायत
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.रामदास हरिचंद्र पाटील यांनी त्यांचा मुलगा कु.वंश रामदास पाटील याचा जन्म दि.२७/१०/२०१८ रोजी निल हॉस्पिटल, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेला आहे. तथापि सदर अर्जदार यांनी त्यांचा मुलगा कु.वंश रामदास पाटील हा दि.२७/१०/२०१८ रोजी मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झाल्याबाबत नोंद होवून मिळणेकरिता मे.न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. तथापि सदर अर्जास कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये व मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कारवाई करेल व ते अर्जदार यांचा मुलगा कु.वंश रामदास पाटील यांचे जन्मासंबंधी योग्य ते आदेश मंजूर करेल.

आज दि.२४/०१/२०२२ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



मा.पांडे साहेब यांचे कोर्टात

अॅड.प्रदीप भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्र.७३/२०२२
ने.ता. २४/०२/२०२२

श्री.सदाशिव सिताराम पाटील
वय : ६८ वर्षे, धंदा : शेती
रा.बामणडोंगरी, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक
ग्रामपंचायत वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा मयत राघो रामा पाटील हे दि.२५/०२/१९७६ रोजी मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तथापि अनावधानाने मयत राघो रामा पाटील यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत राघो रामा पाटील यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होण्याकरिता दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज रोजी दि.२०/०१/२०२२ रोजी माझ्या सहने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

# संक्षिप्त...

## आण्णा कंधारे यांच्या तर्फे मुरुडमध्ये विविध कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

प्रजासत्ताक दिनी मकरसंक्रांत व स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्ताने भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठनेते तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्य जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे यांच्या तर्फे दि.२६ जानेवारी रोजी मुरुडमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील सुभाषचंद्र बोस मार्गावरील शेगवाड्यातील राजयोग बंगला येथे मकर संक्रांत व प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सकाळी १०.०० वा. भारत माता पूजन व सायंकाळी ५.०० वा. ते रात्रौ ८.०० वा.तीळगुळ वाटप, महिलांसाठी हळदीकुंकू (वाण)वाटप समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला शहरातील नागरिक व महिलांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी. असे सुदर्शन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा भा.ज.पा. ज्येष्ठनेते जनार्दन तथा आण्णा कंधारे व सौ. सिमा जनार्दन कंधारे यांनी निमंत्रणाद्वारे कळविले आहे.

## बाळासाहेब ठाकरे यांना जयंती निमित उरण शहर शाखेतर्फे अभिवादन

**दै.रायगड नगरी । उरण**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर व उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उरण शहर शाखेतर्फे भावपूर्ण आदरांजली वाहून अभिवादन करण्यात आले.

या वेळी गटनेते गणेश शिंदे, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, आरोग्य कक्षाचे जिल्हा समन्वयक रमेश म्हात्रे, माजी शहरप्रमुख महेंद्र पाटील, उपशहरप्रमुख कैलास पाटील, अरविंद पाटील, महिला उपजिल्हासंघटिका ममता पाटील, तालुका संघटिका(शहर) सुजाता गायकवाड, नगरसेविका वर्षा पाठारे, शहर संघटिका वीणा तलरेजा, शहर संघटिका मेघा मेस्त्री, संपर्क संघटिका श्रद्धा सावंत, उपशहर संघटिका रझिया शेख, मुमताज भाटकर, रुबिना कुट्टी, संगीता लोळगे, रजनी लोळगे, कविता पाटील, कल्पना गराडे, नगरसेवक समीर मुकरी, मा नगरसेवक निलेश भोईर, विभागप्रमुख एस के पुरो, गणेश शेलार, वैभव करंगुटकर, संजय गावंड, डोमनिक कोळी, अवजड वाहतूक सेनेचे तालुका अध्यक्ष चेतन म्हात्रे, उपतालुका संघटक के एम घरत, महेश वर्तक, विकी म्हात्रे, रियाज मुकादम, प्रदीप शेळके, शेखर पडते, मिलिंद भोईर, नंदू पाटील, भारत पाटील, निखिल पाटील, संजय पाटील, माणिक पाटील, इस्माईल शेख सर्व आजी-माजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते



# पोलादपूर येथील छ.शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उपेक्षित

## चौपदरीकरणानंतर ठेवणार की हटविणार याबाबतही अनिश्चितता!

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्याचे ठिकाण असलेल्या कोकणच्या प्रवेशद्वाराचे शहर पोलादपूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा सध्या धुळीच्या चादरी ओढलेल्या मळलेल्या स्थितीत उपेक्षित अवस्थेत उभा आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या सद्यस्थितीत सुरु असलेल्या चौपदरीकरणादरम्यान या पुतळ्याचा अडथळा होऊ शकेल इतपत वाहतुकीची कोंडी या परिसरात जाणवत असताना चौपदरीकरणानंतर ठेवणार की हटविणार याबाबतही अनिश्चितता दिसून येत आहे.

अलिकडेच पोलादपूर शहरातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६चे काम अंडरपास स्वरूपाचे स्पष्टपणे दिसून येऊ लागले असून या अंडरपास राष्ट्रीय महामार्गावरील बाजूचा पूर्वे कडील सर्व्हिसरोड हा छ.शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा सर्व्हिसरोडच्या मधोमध वाहतुकीस अडथळा अशा स्वरूपाचा असल्याचे वारंवार होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीमुळे जाणवू लागले आहे. अंडरपासमधून महाबळेश्वर रस्त्यावर जाण्यासाठी असलेल्या पश्चिमेकडील सर्व्हिसरोडवरून पूर्वेकडील सर्व्हिस रोडवर येण्यासाठीच्या छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्यालगतच्या पुलांमुळेदेखील हा पुतळा वाहतुकीच्या रहदारीमध्ये अडथळा असल्याचे जाणवू लागले असताना काही व्यक्तींच्या समुहाने या पुतळ्याच्या देखभाल व निर्णयासाठीचा ट्रस्ट स्थापन करण्याच्या कामास वेग धरल्याचे सांगण्यात येत आहे.

सद्यस्थितीत छ.शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा धुळीच्या साम्राज्याखाली खराबस्थितीत दिसून येत आहे. याकडे शिवप्रेमींचे जरी लक्ष जात असले तरी पुतळा गेल्या अनेक महिन्यांपासून धुतलेला दिसून येत नाही शिवाय या पुतळ्याला अनेकठिकाणी अवकाळी पडलेल्या पावसामुळे धुळीवर पाऊस पडून चिखल-ासारखे धब्बे बसल्याचे दिसून येत आहे. पोलादपूर नगरपंचायत या पुतळ्याची देखभाल करीत नाही तसेच काही समाजसेवींच्या संघटनेने यासंदर्भात पुढाकार घेतल्यानंतरही पुरेसे लक्ष न दिल्याने पुतळ्याभोवती लावलेल्या शोभिवंत रोपांच्या पानांवरही धुळीचे लोट बसलेले दिसून येत आहेत. पोलादपूर शहरातील



नळपाणीपुरवठा योजनेच्या एका जंक्शनलगत या पुतळ्याचे अस्तित्व असल्याने सद्यस्थितीत पुतळा काहीसा कलंडलेला दिसून येत आहे.

लवकरच पोलादपूर तालुक्यातील चौपदरीकरणाचे काम घाईघाईने संपवून एलअँण्डटी ही ठेकेदार कंपनी गाशा गुंडाळण्याच्या तयारीमध्ये असताना छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे भवितव्य काय असेल याबाबत अद्याप कोणीही ठामपणे भाष्य करताना दिसून येत नसले तरी अंडरपास राष्ट्रीय महामार्गासाठी सुरू असलेल्या उत्खननामुळे या पुतळ्यावर धुळीचे लोट बसून पुतळ्याची दूरवस्था होत असलेली शिवप्रेमींना उघड्या डोळ्यांनी पाहावी लागत आहे.

पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील २५६५० क्षेत्रावरील २५३ बाधित लाभार्थी एकवटण्याची शक्यता नगरपंचायतीच्या पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीने फोल ठरली आणि पोलादपूर शहराच्या महाड बाजूने प्रवेशावेळीच पंचायत समिती कार्यालयापर्यंत दोन्ही बाजूने समान भूसंपादन झाले असताना त्यापुढे केवळ पश्चिमेकडे सडवली रस्त्यापर्यंतचे भूसंपादन झाले आहे. मात्र, यादरम्यान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळ्याचे अस्तित्वही भूसंपादन रेषेत आल्याने भावनिक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता एसटी स्थानकासमोरील भूसंपादनाच्या चर्चेत दुर्लक्षित झाली.

पोलादपूर पंचायत समितीच्या डिसेंबर २०१७च्या आमसभेमध्ये यावेळी पोलादपूर शहरातील छ.शिवाजी महाराजांचा पुतळा शक्यतो हलविला जाणार नसल्याची माहिती अभियंता महामार्ग बांधकाम विभागाचे गायकवाड यांनी दिल्यानंतर आमसभाध्यक्ष आ.गोगावले यांनी नवीन पुतळा बसविण्याची सूचना केली. यावेळी पत्रकार शैलेश पालकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी चौपदरीकरणाबाबत जनसुनावणी अथवा जनप्रबोधन केले नसल्याचे तसेच प्रकाश कदम यांनी शिवछत्रपतींचा पुतळा शक्यतो हलविला जाणार नसल्याचे का बोलले जात आहे, असा प्रतिप्रश्न करून पुतळा तेथेच राहिला पाहिजे असा आग्रह केला होता. मात्र, आता छ.शिवाजी महाराजांच्या याच पूर्णाकृती अश्वारूढ पुतळ्याची धुळीमुळे झालेली दूर्दशा पाहता या पुतळ्याच्या भविष्यातील अस्तित्वाबाबतच शंका निर्माण होऊ लागली आहे.

## माथेरानच्या समृद्धीचे विकास पर्व खा.बारणेंकडे सुपूर्द

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सद्यस्थितीत माथेरान मधील सर्व भागात होत असलेली विकास कामे ही खऱ्या अर्थाने माथेरानला मिळालेली नवसंजीवनी आहे. या सुंदर पर्यटनस्थळाचा विकास यापुढेही निरंतर सुरूच राहणार आहेत.त्यातच सलग पाच वर्षे नगराध्यक्षा पद हे थेट जनतेतून प्राप्त झाल्यामुळेच तत्कालीन नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांना या गावातील अनेक महत्वकांक्षी कामे पूर्ण करण्यासाठी वाव मिळाला होता.

आजवरच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कामांचे माथेरानच्या समृद्धीचे विकास पर्व ह्या पत्रिकेचे अनावरण नुकताच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती दिनी करण्यात आले होते.

त्याची प्रत मावळचे खासदार ज्यांचे माथेरान वर विशेष लक्ष असून अनेक कामे मार्गी लावण्यासाठी आणि शासकीय निधी मंजूर करून देण्यात सिंहाचा वाटा आहे. त्या खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांना त्यांच्या निवासस्थानी जाऊन ही महत्वपूर्ण विकास कामांची प्रत शिव-सेनेचे संपर्क प्रमुख प्रसाद सावंत आणि नेरळ ग्रामपंचायत सदस्य प्रथमेश मोरे यांनी सुपूर्द केली आहे.



## पालीत भर नाक्यावर दारू पिऊन गैरवर्तन करणाऱ्या दोन तरुणांना पोलीसांचा दणका

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील लवाटे नाक्यावर सोमवारी (ता.२४) पहाटे पावणे तीनच्या सुमारास भर चौकात दारू पिऊन गैरवर्तन करणाऱ्या दोन तरुणांवर पाली पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत फिर्यादी पोलीस नाईक लिंबाजी शेडगे यांच्या फिर्यादीवरून सविस्तर माहिती अशी की या दोन तरुणांनी आपली मोटार पालीतील लवाटे नाक्यावर भर रस्त्यावर मधोमध थांबविली होती. यावेळी त्यांनी दारूचे सेवन करून मद्यधुंद अवस्-थेत गैरवर्तन करून रहदारीला अडथळा आणला. या कारणामुळे त्यांच्यावर प्रो. वा. रजिस्टर नंबर ०९/२०२२ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ८५ (१), (अ), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९४९ चे कलम १०२, ११७ प्रमाणे पाली पोलीस स्थानकात सोमवारी (ता.२४) सकाळी ७.१७ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे व सहायक पोलीस निरीक्षक अजित साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक एस.एन.फडताडे करीत आहेत.

## फ्लॅट भाड्याने घेऊन फसवणूक करणारे दोघे जण गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इस्टेट एजंटचे काम करणाऱ्या एका तरूणाच्या जागरूकतेमुळे बनावट नाव व कागपत्रांद्वारे फ्लॅट भाड्याने घेऊन गैर कृत्य करणाच्या प्रयत्नात असलेले दोघे भामटे पोलिसांच्या जाळ्यात सापडल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे.

पृथपालसिंग सहोता (वय-४८) आणि अनमोल सिंग उर्फ अमरिकसिंग बामारा (वय-६०) अशी या दोघा भामट्यांची नावे असून खारघर पोलिसांनी या दोघांवर फसवणूकीसह बनावटगिरीच्या गुन्ह्याखाली अटक केली आहे. या दोघांनी फ्लॅट मालकाची फसवणूक करण्यासाठी बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून सदर प्रकार केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले असले तरी खारघर पोलिसांकडून या दोघांची कसून चौकशी करण्यात येत आहे.

## बारमाही पावसामुळे पिकांची नुकसानी तर वीट भट्टी व्यवसाय धोक्यात

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील कोलाड , खांब, देवकान्हे, धामणसई विभाग परिसरात अवकाळी पाऊस कोसळत असल्यामुले आता बळीराजा अक्षरशः मेटाकुटीला आला असून ते भात शेती बरोबरच घेत असलेल्या कडधान्य पिकाची पूर्णतः नासधूस, तर कालव्याच्या पाण्यावर उन्हाळी रब्बी हंगाम पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या चिंतेत अधिक वाढ झाली आहे तर वीटभट्टी व्यवसाय पूर्णतः धोक्यात आला असून या अवकाळी होत असलेल्या पावसामुळे मानवी जनजीवनावर परिणाम होत आहे .



आता बारमाही पडत असलेल्या पावसामुळे बळीराजाच्या विविध पिकांना मोठा धोका निर्माण झाला सततच्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांनी लागवड केलेले खरीप हंगाम पिकानंतर मूग, मडकी, चवळी, वाल, पावटे, हरभरे, असे विविध कडधान्य त्याच बरोबर काही शेतकरी भाजी पाल्यात मिरची, वांगी, टॉमेटो, घोबी, सह पाले भाज्या लागवड करत थेट त्याचा बाजार नेऊन विक्री व्यवसाय करतात ते पीक देखील धोक्यात गेल्याने चिंता वाढली तर कलींगड पीक तसेच फलबागायतदारांना सुगीचे दिवस नाहीच शेवगाच्या शेंगां बाजेवर देखील या अवकाळी पावसाचा परिणाम झाला असून ते व्यवसायिक देखील संकटात सापडला आहे या ना त्या कारणाने बळीराजा कायम ग्रासला आहे. त्याच्यावर अनेक प्रकारचे संकट येत असतात जात असतात मात्र तो कधीच खचून जात नाही संपूर्ण जगाचा पोशिंदा समजला जातो सर्वांचीच भूक भागवण्याचे काम कवाड कष्ट करत तो भागवत असतो मागील दोन वर्षे त्याच्यावर अनेक संकट त्यातच गेल्या दोन दिवसांपासून पूर्णतः ढगाळ वातावरणानंतर शनिवार दि.२२ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास रोहा तालुक्यात ठीक ठिकाणी मोठया प्रमाणात अवकाळी पाऊस पडला. धुवांधार अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेती व्यवसाय व वीट भट्टी व्यवसाय धोक्यात आला आहे.

पहाटेच्या सुमारास धुक्का व सकाळी थंडी व नंतर पाऊस यामुळे लोकांच्या जीवनमानावर परिणाम होताना दिसत असून यामध्ये कोरोना ही लोकांची साथ सोडण्यास तयार नाही यातच भरीत भर म्हणून काल झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी-बागायतदारांच्या कडधान्य व भाजीपाला या पिकांसह वीटभट्टी व्यवसायाला धोका निर्माण झाला असून यामुळे शेताकऱ्यांच्या चिंतेत प्रचंड वाढ झाली आहे.

## बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित द्रोणागिरी शहर महिला शाखेतर्फे हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित द्रोणागिरी शहर महिला शाखेतर्फे हळदी कुंकू चा समारंभ साजरा करण्यात आला.



या प्रसंगी द्रोणागिरी शहर प्रमुख जगजीवन भोईर, उरण तालुका महिला संघटक भावनाताई म्हात्रे, द्रोणागिरी उप शहर प्रमुख कु.प्रतिक पाटील, द्रोणागिरी शहर सचिव धनंजय शिंदे, द्रोणागिरी युवा सेना अधिकारी करण पाटील, द्रोणागिरी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र पाटील, शिक्षक पतपेढी संचालक रमणिक म्हात्रे सर, फेरीवाले संघाचे अध्यक्ष सोमनाथ भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत द्रोणागिरी शहर शाखेतर्फे हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करण्यात आले.

या वेळी सेक्टर ४८ चे उपशाखा प्रमुख बाजीराव घोडके, युवा अधिकारी हितेश घरत, सेक्टर ५० चे शाखा प्रमुख अंकुश चव्हाण ,युवा अधिकारी सोपान दहिफळे, सेक्टर ५१ चे शाखा प्रमुख संजय कापसे, सेक्टर ५२ चे शाखा प्रमुख बापू गरुड, केतन नाईक, सागर खांडेकर, विष्णू जाधव, स्वराज तोटे, राजे भोसले, कु.रविना ठाकूर, उपजिल्हा युवती अधिकारी, कु.बेबी ठाकूर, उपतालुका युवती अधिकारी अंकिता घरत, उपतालुका युवती अधिकारी महिला आघाडी सुरेखा भोईर, रेश्मा जाधव, प्रियांका म्हात्रे, स्वाती चव्हाण, सुप्रिया शिंदे, स्वाती घोडके, कल्पना कापसे, छाया दहिफळे, प्रणाली ठाकूर, अनुजा साळुंखे, मीना बाभुळकर, आणि सर्व महिला गट या सर्वांच्या उपस्थितीत सेक्टर ४८ च्या नंदा नोळे शाखासंघटक महिला आघाडी, वीर मॅडम उपशाखा महिला संघटक व छाया सुर्यवंशी सचिव या पदाधिका-यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित शिक्षक पतपेढीचे संचालक रमणिक म्हात्रे व सोमनाथ भोईर यांचा सत्कार करण्यात आला.

## पिरवाड समुद्रकिनारी स्वच्छता



**दै.रायगड नगरी । उरण**

बीच वॉरियरच्या २०० व्या आठवड्याच्या निमित्ताने बीच वॉरियर ही सामाजिक संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते राघव जुयाल यांनी पुढाकार घेऊन किमान २०० ठिकाणी साफसफाई करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत उरणमधील सेव्ह अवर बीच उरण ग्रुप आणि केडीएस कॉलेजच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी उरण समुद्र किनारा स्वच्छ केला.

सेव्ह अवर बीच उरणचे सदस्य अमोल दुरुगकर, भूमिका सिंग, शिवा म्हात्रे, ओम म्हात्रे, तसेच केडीएस महाविद्यालयातील डॉ. डी.पी.हिंगमिरे, डॉ.अरुण चव्हाण, डॉ.एम. जी.लोटे, रामकृष्ण, एच.के.जगताप, अन्वेश कोळी, आसफ, डॉ. नेहा भरत पवार, त्रिजन पाटील, चेतन चोडणकर, साहिल कणेकर आदी पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## माथेरानला होणार राष्ट्रीय पर्यटन दिन साजरा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या माथेरान-ला महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार नुसार २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय पर्यटन दिन साजरा करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी सांगितले. राष्ट्रीय पर्यटना निमित्त माथेरान मध्ये विविध स्पर्धेचे आयोजन केले असून यात कोवि-१९ चे सर्व नियमाचे पालन करण्यात येणार असून माथेरान मध्ये येणा-या पर्यटकांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, या मध्ये मॅरेथॉन स्पर्धा, अश्व शर्यती, अश्वाचा फॅशनशो या सारखे कार्यक्रम करण्यात येणार असून या कार्यक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त पर्यटक माथेरान मध्ये यावेत म्हणून प्रयत्न करण्यात येणार आहे अशी माहीती मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे यांनी दिली.

## धनंजय जगताप यांची नागोठणे शिवसेना शाखाप्रमुखपदी निवड

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. उध्दवजी ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना नेते किशोरभाई जैन यांच्या शिफारशीने नागोठण्यातील युवा शिवसैनिक धनंजय जगताप यांची शिवसेनेच्या नागोठणे शाखा प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. शिवसेना प्रमुख हिंदुहृदसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून धनंजय जगताप यांना शिवसेना शाखेत शाखाप्रमुखपदाचे नियुक्ती पत्र शिवसेना नेते व राजिप सदस्य किशोरभाई जैन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले त्यावेळी रोहा पंचायत समिती सदस्य संजय भोसले, नागोठणे ग्रामपंचायतीचे उपसरपंच मोहन नागोठणेकर, नागोठणे ग्रामपंचायतीचे सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, भक्ती जाधव, सुप्रिया महाडिक, कल्पना टेमकर, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश कांबळे, किरण लाड, राजीव टेमकर, संतोष नागोठणेकर, दिनेश वादळ, ऋत्विक माने, गौरव नागोठणेकर आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

धनंजय जगताप हे कराटेचे प्रशिक्षक असून त्यांनी अनेक बालक व तरुणांना कराटे प्रशिक्षण देवून त्यांना परिक्षांना सामोरे जाण्यास लावून चॅम्पियन बनविले. तसेच अनेक तरुण-तरुणींना विविध प्रकारचे बेल्ट मिळवून दिले आहेत. त्यांची तरुणांमध्ये व पालकवर्गामध्ये वेगळी क्रेज आहे. धनंजय जगताप हे गेली १५ वर्ष विभागातील युवक व युवती यांना कराटेचे प्रशिक्षण देत आहेत. धनंजय जगताप यांनी रायगड जिल्ह्यात १५०० ते १८०० कराटे खेळाडूंना प्रशिक्षण दिले आहे. तसेच अनेक राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर त्यांनी खेळाडू घडविले आहेत.

धनंजय जगताप यांच्या कामगिरीमुळे त्यांना रायगड जिल्हा परिषदेचा रायगड भुषण पुरस्कार, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड द्वारेही त्यांना गौरविण्यात आले आहे. जगताप यांचा नागोठणे शहर व विभागातील नागरीक, तरुण युवक यांच्याशी असणारा दांडगा संपर्क लक्षात घेऊन किशोरभाई जैन यांनी त्यांच्याकडे मोठी राजकीय जबाबदारी सोपवली आहे.